*कथा क्रमांक १०*

# सुशांत

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि तितक्यात तिचा फोन वाजला.
हेमा फोनवर होती. " रेणू, उद्या ६ वाजता 'तृप्ती' मध्ये भेटू" इतके बोलून हेमाने फोन ठेवलाही. " ही हेमा अशीच आहे पहिल्यापासून. स्वतः ठरवते काही तरी आणि मी हो म्हणणार असे धरूनच चालते पठ्ठी. " असं स्वतःशीच बडबडत रेणूनं एकीकडे पिशव्यांमधलं सामान रिकामं केलं. पाऊस थांबायची लक्षणं दिसत नव्हती. रेणूला तशीही बाहेरची बरीच कामं होती. मुलगा, सून आणि मुख्य म्हणजे ४ वर्षांचा नातू येणार होते आठवड्यासाठी. त्यासाठी खेळणी आणि इतर खरेदीही अजून बाकी होती.
उद्या 'तृप्ती' मध्ये जायच्या आधी जमलं तर बघू असा विचार करीत रेणूनं सीडी प्लेअर चालू केला. भीमसेनजींचं 'जौ मैं तोपे बलिहारी' सुरु झालं. अनेकदा ऐकलेलं हे भजन तिला भूतकाळात घेऊन गेलं.
पंधरा वीस वर्षांपूर्वी सुट्टीत दरवर्षीप्रमाणे रेणूची सगळी फॅमिली सुभाषकडे, रेणूच्या भावाकडे गेली होती.
तेव्हा तिच्या वहिनीनं तिला विचारलं, " अनायासे परवा तुझा वाढदिवस आहे, काय देऊ तुला, सांग."
सुभाष पटकन् म्हणाला, " रेणूला काही द्यायची जरूर काय? She has everything. ब्रिन्दावनी सारंगच्या काही चीजा मी एकत्र केल्यात, ती सीडी देतो. रेणूबाई एकदम खूश होतील."
त्या आठवणीनं रेणूला आत्ताही हसू आलं. दुसरी आठवण म्हणजे रेणूणचे न् भावाचे वाद. सुभाषला लता मंगेशकर म्हणजे दैवत तर रेणू आशा भोसलेची भक्त. दोघींमध्ये कोण श्रेष्ठ, सतत वाद चालायचे. सुभाष एकदा रेणूला म्हणालाही, "तुझे कान आहेत की कपाचे कान आहेत?" तसंच रेणूचा आवडता राग म्हणजे ब्रिन्दावनी सारंग तर सुभाषचा आवडता यमन. ' यमन मध्ये तो तीव्र मध्यम असा काही मजा आणतो, वा व्वा .... ' म्हणायचा तो.
या सगळ्या आठवणीतली तीव्र आठवण म्हणजे सुभाष-सुशांतची मैत्री. सुभाषचा हा खास मित्र म्हणून नेहमी घरी येणारा सुशांत रेणूचा मित्र कधी झाला ते दोघांनाही कळलं नाही. एक दिवस अचानक सुशांतनं तिला "आपण लग्न करूया !" म्हणून धक्का दिला.
"लग्न करशील का?" म्हणून तरी विचारायचं ना. म्हणे लग्न करूया, रेणू तडकलीच.
"नाही" म्हणून धाडकन् त्याला उडवून लावलं. पण सुशांत हार मानणारा तर नव्हताच नव्हता. रेणू भेटली रे भेटली की "आता तरी हो म्हण, फार भाव खल्लास, Enough!!" म्हणत रहायचा. अखेर रेणूनं हार मानली न् एक दिवशी सुशांतच्या गळ्यात माळ घातली.
सुशांतच्या आठवणीनं ती कळवळली. " असा कसा रे अचानक निघून गेलास तू, " रेणू स्वतः शीच बोलत राहिली. तेवढ्यात डोअरबेल वाजली.

रेणूनं गुणगुणतच दार उघडलं. आता चकित व्हायचीच वेळ आली होती!! दारात हेमा... चिंब भिजलेली, नजर थोडी बावरलेली आणि ओल्या कपड्यांमुळे थरथरत असलेली!

" अग काय हे हेमा, धावतबिवत आलीस की काय? आणि आपण उद्याच तर भेटणार होतो, अचानक काय झालं? थांब आता आधी टॉवेलने केस जरा पूस, माझे कपडे देते, थांब जरा." रेणू बोलत बोलत आत गेली.

हेमा तशीच दारात खिळलेली... उभी राहिली. रेणूनेच मग तिचे केस पुसून दिले. आणि पुन्हा विचारले, " हेमा, अगं सांगशील का मला, काय झालं?"

हेमा हळूच म्हणाली, " अगं काही नाही, सहज मस्त चहा प्यावासा वाटला आणि तुझ्या हातची खेकडा भजी खायची इच्छा झाली म्हणून आले. इच्छा तीव्र झाली म्हणून पटकन् निघाले आणि गाडीने आले. पण पार्किंगपासून तुझ्या दारात येईस्तोवर ह्या मेल्या पावसाने मला अगदी धुवून काढले बघ."

" बरं बाई, आता कपडे बदल, मी चहा करते आणि भजीसुद्धा. पण हेमे, जरा कांदा चिरण्याची तसदी घे म्हणजे लवकर मिळेल खायला, बरं का!"

रेणू आत गेली तशी हेमाने पटकन् खिशातून एक कागद काढला. जाम ओला झाला होता. काहीच कळत नव्हतं काय लिहिलंय त्यावर... फक्त नाव तेवढं नीट वाचता येत होतं. ' सुशांत सरदेसाई '.

हेमाच्या मनातली चलबिचल बहुधा तिच्या डोळ्यांमध्ये डोकावली असेल म्हणूनच रेणूनं मघाशी तिच्याकडे विचित्र नजरेने बघितलं. " खरंच तिला शंका नसेल ना आली, आपल्या अश्या अचानक येण्याबद्दल... चहा आणि भजी ... कायपण कारण काढलंय, व्वा! तसं डोकं बरं आहे आपल्याला! उगाच नाही आज इतकं नाव कमावलंय.... (कशात ते माहीत नाही)!!!" हेमाने स्वतःशीच एक संवाद साधला आणि मग ती आत गेली.

रेणूनं चहा तयार ठेवला होता आणि कांदाही चिरायला सुरुवात केली. हेमा कपडे बदलून आली. हातात ओला चुरगळलेला कागद घेऊन खुर्चीत बसली. खुणेनेच तिने रेणूला कांदा, सुरी आणि ती भाजी चिरायची रेणूची खास बशी मागितली. ओला कागद मांडीखाली लपवून ठेवला. पटापट कांदा चिरला आणि हात धुवायला हेमा उठली तशी कागद खाली पडला. तिच्या ते लक्षातच आलं नाही. पण रेणूने तो उचलला आणि हेमाला खुणेनेच 'हे काय?' विचारले. हेमाने तिच्याकडे बघितलं न बघितल्यासारखं केलं आणि चहाचा कप हातात घेतला.

" हेमा, मी विचारतेय हे काय आहे?" आता मात्र रेणूचा आवाज थोडा धारदार झाला होता. ती मोठ्याने म्हणत होती, "मला नक्की सांगशील का, तू अशी धावतपळत, कावरीबावरी, पावसात भिजत फक्त चहा आणि भजी खायला आलीस? आपण उद्याच भेटणार असून सुद्धा?"

हेमाने मनात काहीतरी ठरविले आणि एकेका शब्दावर जोर देत ती रेणूला म्हणाली, " रेणू, सुशांत जिवंत आहे अजून. हा कागद त्याचा पुरावा आहे ...."

" काय?" रेणू जवळपास कोसळलीच खाली.

हेमाने रेणूच्या तोंडावर थंड पाण्याचा शिडकावा केला. तिला उठवून बाहेर सोफ्यावर बसवलं, प्यायला पाणी देऊन तिला शांत करायचा प्रयत्न केला. रेणूही थोड्याच वेळात भानावर आली.
"हेमा, तुझ्याकडे हा कागद कसा आला? काय लिहिलं होतं त्यात?" रेणूने प्रश्नांवर प्रश्न विचारायला सुरुवात केली.
"अगं, माझ्या दारात पडला होता. कुरियरवाला आला, म्हणून मी दार उघडलं तेव्हा सापडला मला. ओला झाल्यानं अक्षरं पुसटच होती फक्त खाली सुशांत सरदेसाई एवढंच दिसतंय." हेमा म्हणाली. " हेमा, कुठं ग शोधायचं ह्याला? थोडे का प्रयत्न केले. पोलिसांनाही यश नाही आलं."

बारा वर्षं झाली. एक दिवस सकाळी कामावर गेलेला सुशांत घरी परत आलाच नाही आणि आज हा कागद! काय बरं लिहिलं असेल त्या कागदावर? सुशान्तने स्वतः लिहिलं होतं की कोणी जबरदस्तीनं त्याच्याकडून लिहून घेतलं होतं, काही समजेनासं झालं होतं दोघींना.
"मला वाटतं आपण पोलिसांत हा कागद देऊन पुन्हा missing ची तक्रार नोंदवावी. tv वर पण 'आपण ह्यांना पाहिलंत का?' मध्ये पुन्हा जाहीर करावं." रेणू म्हणाली. हेमाला वाटत होतं की आपल्यापर्यंत चिठ्ठी पोहचली आहे तर काही दिवसांत सुशांत स्वतःच हजर होईल. तेव्हा थोडी वाट पहावी.

त्या ओल्या कागदावरच्या सुशांत सरदेसाई ह्या नावाकडे एकटक बघत रेणू स्वतःशीच बोलत राहिली, " सुशांत कुठे आहेस रे तू? कसा आहेस? अरे, तुला माहीत आहे का? आपला सौरभ आता कित्ती मोठा ऑफीसर झाला आहे? 'रिजनल हेड' अशी त्याची पोस्ट आहे. आपल्याला चार वर्षांचा एक गोड नातूपण आहे, त्यांच्यासाठी तरी परत घरी ये."

त्यादिवशी हेमा रेणूकडेच राहिली. रेणूला सोडून जाणं तिला उचित वाटेना. रात्रीच्या जेवणासाठी हेमानेच मुगाच्या डाळीची खिचडी केली. घास काही घशाखाली उतरत नव्हता. केवळ एक उपचार म्हणून दोघी जेवावायास बसल्या. वातावरण स्तब्धच होते. कशातच मन रमत नव्हतं. सौरभला फोन करून सांगावं का असा विचार एकदा मनाला चाटून गेला पण दुसऱ्याच क्षणी " नको, त्याला नको आत्ताच सांगायला, विनाकारण अस्वस्थ होईल. आता येतातच आहेत ना ते सर्व जण, तेव्हा पाहू." असं मनाला पटवून रेणू हॉलमध्ये येरझारा घालू लागली. तिने टीव्ही लावला. पण हातात रिमोट घेऊन सारखे चॅनेल बदलण्यापलीकडे ती काहीच करत नव्हती. हेमा वेगवेगळ्या विषयांवर बोलून तिचं मन

कशात तरी स्थिर करण्याचा प्रयत्न करत होती. " रेणू, घड्याळात बघ, वाजले किती, अग रात्रीचे बारा वाजून गेले. चल आता झोपायला, मग उद्या बघू काय करायचं ते" हेमाने तिला सांगितलं आणि बेडरूममध्ये नेलं.

अंथरुणात रेणू तळमळत होती. संगीताचे स्वरच तिच्या मनाला उभारी देऊ शकतील असा विचार करून हेमाने सीडी प्लेअर ऑन केला. ज्योत्नाबाई भोळे आपल्या अतिशय मधुर आणि तरल आवाजात गात होत्या 'ये झणि येरे येरे येरे माघारी .....'!

गाण्यामुळे रेणू झोपली खरी, पण रात्रभर ती अस्वस्थच होती. जाग आल्याबरोबर तिने घाईघाईने हेमाला उठवले.

"अगं हेमा, हे पत्र तुझ्या दारात सापडलं; माझ्या मते पुन्हा तुझ्याच दारात एखादी चिठ्ठी येण्याची शक्यता आहे. किंवा सुशांत स्वतः ....हेमा, माझं मन भरार्या घेतंय आता. मी काय बोलत आहे, कुठली आशा बाळगून आहे मलाच माहित नाही ...पण तू आधी घरी जा. मी येतेच ...."

हेमाच्या दारात दुसरी चिठ्ठी होतीच. पुन्हा शेवटी सुशांतचे नाव होते. थरथरत्या हाताने हेमाने चिठ्ठी उचलून वाचायला सुरुवात केली:

"हेमा, मी आमच्या घरी गेलो तेव्हा दारावर अनोळखी मालकाचे नाव दिसले. रेणूला कुठे शोधू? ह्या अशा अवस्थेत शेजारी जाणे उचित वाटत नव्हते म्हणून तुझ्या दारी आलो. तुला कालची चिठ्ठी मिळाली नसेल कदाचित असं वाटलं. असो. माझी कहाणी सांगतो.

तेरा वर्षांपूर्वी ऑफिस मधले टेन्शन वाढले. मी काम प्रामाणिकपणे करत होतो, तरी माझ्यावर मी न केलेल्या गोष्टींचे आरोप करण्यात आले. नंतर माझी बाजू त्यांना पटल्यावर सुद्धा परिस्थिती फार बदलली नाही. मानसिक तणाव वाढू लागला. बरेच दिवस असे गेले. मी घरी काहीही सांगितले नव्हते. सांगायला हवे होते....ओझं हलकं झालं असतं. मनःशांतीसाठी मी जवळच्या एका बाबाजींना भेटायला जायला लागलो.

एकदा बाबाजी म्हणाले, "हिमालयात माझ्या ओळखीचे उत्तम गुरू आहेत. तुला त्यांच्याकडे नेतो."

दोन दिवसात परत येईन अशा तयारीत मी ऑफिसहून थेट प्रवासाला लागलो. हिमालयातले गुरू म्हणाले रहा काही दिवस. बरा होशील. वाटले, बुद्धासारखे आपल्याला तत्त्वज्ञान प्राप्त होईल. जेवणात काहीतरी मिसळले होते का कोणास ठाऊक, पण भान हरवून बसलो, व परत यायची इच्छाच झाली नाही. वर्षे कशी गेली कळलेच नाही. मी दाढी वाढवली. स्वरूपच बदलले माझे. तिथलाच झालो मी.

काही वर्षांनी हिमालयाच्या पायथ्याशी एका मंदिरात सल्ले देउ लागलो. एके दिवशी एक बाई अगदी कावरीबावरी माझ्याकडे आली. नवरा पळून गेला होता...दोन लहान मुले...सगळं ऐकल्यावर मी म्हणालो, "तो पळून गेला, चूक केली त्याने. आधी कर्तव्य निभावायला हवे होते."

माझ्या ह्या वाक्यामुळेच मला जाणीव झाली मी किती चुकलो ह्याची. मी गेलो तत्त्वज्ञानाच्या शोधात. पण रोजची जबाबदारी सांभाळून रेणूनेच खरा ईश्वर साधला होता. मी मात्र आयुष्याला घाबरून पळून गेलो. चुकलो मी.

पण ती मला माफ करेल का? म्हणून हे पत्र तुला लिहिले आहे. तूच तिला सांग सगळं. मला बघून तुम्हाला धक्काच बसेल. परत हा लिहिणारा खरा मीच का ही तुमची खात्री नसेल बहुतेक. म्हणून मी घरी येणार नाही. जवळच्यां मारुतीच्या मंदिरात वाट बघीन तुमची उद्या."

हेमाने दाखवलेले पत्र वाचून रेणू भारावून गेली. काय खरे, काय खोटे, काही कळतच नव्हते. रेणू आनंद, राग, काळजी, शंका, ह्या विचार-वादळात सापडली होती.

"हेमा, अगं सुभाषला हे सगळं सांगितल्या शिवाय मंदिरात जाणं बरं नाही वाटत बाई मला," असं म्हणून तिने स्वतःच्या भावाला फोन वर सगळी बातमी दिली.

स्टोरी १०_५

रेणूचा फोन आल्यानंतर सुभाष विचार करू लागला खरे असेल का हे ? सुशांत असा कसा काय निघून गेला आणि आता परत येतो आहे.इतकी वर्ष त्याला रेणूची,सौरभची आठवण झाली नाही? काय गौडबंगाल आहे हे पाहायला पाहिजे,आणि सुशांत आपल्याघरी येऊ शकत होता हेमा कडे का गेला? सगळेच अनुत्तरीत प्रश्न आहेत.

सुभाष दुसऱ्या  दिवशी रेणुकडे गेला. हेमा ने त्याला ते दोन्ही कागद दाखविले अक्षर सुभाषसारखे वाटत होते.हेमाला अजून एक चिठ्ठी मिळाली होती त्यात दुपारी ४ वाजता मी मारुतीच्या मंदिरात असेन असे लिहिले होते.रेणूच्या छातीत धडधडायला लागले. नक्की सुशांत असेल कि कोणी तोतया आपल्याला फसवितो आहे. सुभाष बरोबर होता म्हणून ठीक होते. हे सगळ सौरभला सांगितले नव्हते.

रेणूने घरी देवाला नमस्कार केला, चार वाजता ते तिघे आणि साध्या वेशातला एक पोलीस मित्र असे चौघे मारुतीच्या मंदिरात गेले.पायरीवर एक दाढी वाढलेला साधू बसला होता.त्यांना पाहून तो उठून उभा राहिला आणि त्याने नमस्कार केला.तो सुशांतच होता हे ओळखायला कोणालाही वेळ लागला नाही.त्याची उंची, शरीरयष्टी आणि मुख्य  म्हणजे त्याचे  डोळे,नक्की तो सुशांतच होता.

“मला माफ कर सुभाष,रेणू मी तुमचा गुन्हेगार आहे. मला फक्त तुम्हाला भेटायचे होते,मी कसलीही मागणी करत नाही तुमच्याकडे,फक्त माझे म्हणणे ऐकून घ्या.”

सुभाष आणि रेणू सुशांत कडे बघतच राहिले असा उंचापुरा, देखणा सुशांत, काय अवस्था करून घेतली होती त्याने. मंदिराच्या आवारात सर्वजण बसले.सुशांत सांगू लागला,

“ऑफिस मधून मी खरच दोन दिवसांसाठी त्या गुरुंना भेटायला गेलो,रेणूला सांगितले नाही कारण तिचा विश्वास बसला नसता आणि तिला मला टेन्शन द्यायचे नव्हते.त्यांनी चार दिवस आणखी रहायला भाग पाडले.त्यांना एकदा भजन म्हणून दाखविले तर ते म्हणाले “ तुम अभी हमारे साथ रहो,आजसे भजन गाना तुम्हारा काम है”

मी त्यांना परोपरीने समजाऊन सांगितले कि माझे कुटुंब आहे पण ते ऐकायलाच  तयार नव्हते. त्यांच्या मते मला ईश्वराने त्यांच्या कडे भजन गायला पाठविले होते. मी थोडे दिवस काढू इथे असा विचार केला, पण नंतर नजरबंद केल्यासारखे त्यांचे शिष्य माझ्यावर लक्ष ठेवायचे.तो रस्ता

हि इतका कठीण होता कि मला तिथून बाहेर पडणे शक्य नव्हते.मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे भजन गाऊ लागलो, बरेच भक्त आजूबाजूला असायचे पण मी कुणाशी बोलू शकायचो नाही, माझ्यावर सक्त पहारा असे.माझ्यामुळे त्यांना खूप दक्षिणा मिळायची,फळ ,मिठाई कपडे सर्व विकून ते पैसे कमवायचे,चरस गांजा प्यायचे,मी त्या टोळीत पूर्णपणे अडकलो होतो.

एका भक्ताला हे कळले तेव्हा त्याने मला गुंगीची पावडर आणून दिली,मी एकदा त्या सर्वांच्या पेयात ती टाकली आणि ते झोपले असताना तो भक्त मला बाहेर घेऊन आला तो पण माझ्या बरोबर आला आहे. माझ्याकडे पैसे नाहीत त्यांना द्य्याला,मला फक्त तेव्हढी मदत करा,मी हेमाला मुद्दाम हे लिहिले नाही कारण तिचा विश्वास बसला नसता ”

सुशांतच्या डोळ्यातून पाणी ओघळत होते.सुभाष त्याला म्हणाला “सुशांत असा विचार करू नकोस आम्हाला तू मिळाला यात सर्व काही मिळाले,तुम्ही आधी दोघे घरी चला”

“ थांब सुभाष, मला आधी रेणूशी बोलू दे”

बाकीचे बाजूला गेल्यावर सुशांत रेणूला म्हणाला “ रेणू मला माफ कर,मी तुला खूप त्रास दिला,तू एकटीने सर्व कसे सहन केले असशील?पण मी जे काही बोललो त्यातला शब्द न शब्द खरा आहे. माझी तुझ्याकडून कसलीही अपेक्षा नाही”

रेणूने डोळे पुसता पुसता सुशांतचा हात हातात घेतला आणि म्हणाली“सुशांत असे बोलू नकोस,मी जसे भोगले आहे तसेच तू ही कमी नाही भोगलेस,मी एकटीच राहते,आपला सौरभ आता मोठा ऑफिसर झाला आहे आणि आपल्याला सून आहे, छोटा नातू आहे.आपण आता एकत्र राहून ह्या सगळ्याचा उपभोग घेऊ,एक दिवस हि असा गेला नाही कि मी तुझी आठवण काढली नाही,आणि आता तू समोर आहेस तर मी तुला कसे जाऊ देऊ ? चल घरी चल, सुशांत, आपले घर तुझी वाट पाहत आहे”

“रेणू तू मला क्षमा केलेस आणि accept केलेस यात मी भरून पावलो, तुझा प्रत्येक क्षण आनंदी करीन असे मी तुला वचन देतो ”

सुभाष ने सौरभलाही बोलावून घेतले होते सौरभने आई बाबांना नमस्कार केला.इतके वर्ष देवाची जी भक्ती केली त्याचे फळ सुशांतला मिळाले होते. हेमा,सुभाष हा आनंद सोहळा लांबून बघत होते.